दक्षता रोध

पार करण्यास अनुज्ञा देण्याची प्रकरणे विनाविलंब निकालात काढणे.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक:एसआरव्ही-१०८६/२६०२/बारा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० ऑक्टोबर १९८६.

<u>संदर्भ</u>:- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०८५/प्र.क्र.२९/१२, दिनांक १ जून १९८५.

<u>परिपत्रक</u>:- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०८५/प्र.क्र.२९/१२, दिनांक १ जून १९८५ अन्वये सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:एसआरव्ही-१०७५/१०, दिनांक २८ ऑक्टोबर १९७६ मधील आदेशांचे यथायोग्य पालन करणे आणि अशा प्रकरणी विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. तथापि, दक्षता रोध पार करण्याच्या प्रकरणात अंतीम निर्णय घेणे व अनुज्ञा देण्याबाबतचे आदेश निर्गमित करणे यात अद्यापही अनेक वेळा विलंब होत असल्याची प्रकरणे शासनाच्या निदर्शनास आणण्यात आली आहेत. दक्षता रोध पार करण्यास अनुज्ञा देण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यांनी दक्षता रोध पार करण्यास देय झालेल्या शासन सेवकांची प्रकरणे निर्णय घेण्यासाठी त्यांची प्रकरणे वेळीच परिपूर्णरित्या उपलब्ध राहतील अशी काळजी घ्यावी.

एच-६२८[४,०००-१०-८६] [कृ.मा.प.]

२. मंत्रालयाच्या सर्व विभागांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना अशी विनंती करण्यात येत आहे की, उपरोक्त क्रमांक:एसआरव्ही-१०७५/१०, दिनांक २८ ऑक्टोबर १९७६ च्या परिपत्रकातील सूचनांचे काटेकोरपणे पालन व्हावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र.बा. देसाई,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

१] राज्यपाल यांचे सचिव,
२] मुख्य मंत्री यांचे सचिव,
३] प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई [पत्राने],
४] प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई [पत्राने],
५] प्रबंधक, लोक आयुक्त व उप-लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई [पत्राने],
६] महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
७] महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
८] अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९] विविध मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व सर्व कार्यालय प्रमुख,
१०] मंत्रालयाचे सर्व विभाग.